**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
**Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2021: 7.278, www.srjis.com**
PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, OCT-NOV, 2022, VOL-10/54

# हलबा जमातीमधील स्त्रियांचे सक्षमीकरण

**सहा. प्रा. महेंद्र नारायणजी कुंभारे[1] & अनिल पी. जैन[2], Ph.D.**

*[1]संशोधक, समाजशास्त्र विभाग प्रमुख, चिंतामणी महाविद्यालय, घुघुस. ता. जि. चंद्रपूर*
*[2]मार्गदर्शक, पी.डी. जैन कला महाविद्यालय, अनसिंग. जी. . वाशिम.*

**Paper Received On:** 25 NOV 2022

**Peer Reviewed On:** 30 NOV 2022

**Published On:** 1 DEC 2022

**Abstract**

*स्त्री सक्षमीकरण ही संकल्पना आजच्या आधुनिक काळामध्ये अतिशय क्लिष्ट, गुंतागुंतीची, आणि बहुआयामी झाल्याचे आढळून येते. स्त्री ही आर्थिक दृष्ट्या परावलंबी, राजकीय दृष्ट्या उदासीन, शिक्षणात दुर्लक्षितपणा, कुटुंबात दुय्यम तसेच समाजामध्ये उपभोग्य बनल्याचे आढळून येते. परंतु आज एकविसाव्या शतकामध्ये (स्पर्धा आणि विज्ञानाच्या युगामध्ये) मानव भौतिक व वैज्ञानिक प्रगतीच्या शिखरावर पोहोचला असताना देखील स्त्री- पुरुष समानतेचा प्रश्न समाजात त्याला सोडविता आला नाही, ही अतिशय चिंतनीय बाब आपल्या समाजासमोर आवासून उभी असल्याचे आढळून येते. स्त्री व पुरुष यांच्यातील पुरुषप्रधान संस्कृतीने समाजामध्ये ध्रुवीकरण करून घडवून आणले आहे. या ध्रुवीकरणाला छेद देऊन समाजात स्त्रियांनी शिक्षणाच्या प्रभावी माध्यमातून पुरुषांप्रमाणे कर्तृत्व दाखविण्याची संधी प्राप्त करून देण्याचा आग्रह करणारी स्त्री सक्षमीकरण ही एक सामाजिक चळवळ असल्याचे आढळून येते. कौटुंबिक जीवनात स्त्री आणि पुरुषांना अतिशय महत्त्वाचे स्थान आहे कारण स्त्री शिवाय पुरुषांचे व पुरुषांशिवाय स्त्रियांचे अस्तित्वच नाही, नव्हे तर त्यांच्या जीवनाला पूर्णत्व येणार नाही. स्वामी विवेकानंद यांनी असे म्हटले आहे की, " जगाचा विकास स्त्री शिवाय शक्य नाही. ज्याप्रमाणे पक्षाला एका पंखाने उडता येत नाही, तसेच मानवाला स्त्री शिवाय प्रगती करता येत नाही."हलबा जमातीतील स्त्रियांना देशाच्या आर्थिक विकासामध्ये सहभाग वाढवून त्यांना आर्थिक दृष्ट्या सक्षम बनविणे अत्यंत आवश्यक आहे. अशा प्रकारच्या बदलांमध्ये परिवर्तन करण्यासाठी प्रत्येक स्त्री पुरुषांनी आपल्या कुटुंबापासून याची सुरुवात करणे अत्यंत गरजेचे आहे. याकरिता हलबा जमातीतील स्त्रियांमध्ये स्वयं जागृती व जनजागृती घडवून आणणे तसेच शासनाच्या योजनांचा, प्रशिक्षणाचा आणि विविध प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन करून हलबा जमातीतील स्त्रियांमध्ये सक्षमीकरणास फार मोठ्या प्रमाणात सहाय्य होईल.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## अध्ययनाचे उद्देश :-

१. हलबा जमातीतील स्त्रियांच्या झालेल्या सक्षमीकरणाचा अभ्यास करणे.
२. हलबा जमातीतील स्त्रियांच्या झालेल्या क्षमीकरणासाठी भविष्यातील वाटचालीचा अभ्यास करणे.
३. हलबा जमातीतील स्त्रियांच्या आर्थिक प्रगतीचा अभ्यास करणे.

## अध्ययन पद्धती:-

सदर शोधनिबंध लिहिताना दुय्यम अध्ययन पद्धतीचा उपयोग करण्यात आलेला आहे. यात वृत्तपत्रे, मासिके, संदर्भ ग्रंथ, पेपर कटिंग इत्यादी विविध प्रकारच्या साधनांचा वापर करण्यात आलेला आहे.

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

**प्रस्तावना:-**

कोणत्याही समाजाचे (मग तो आदिवासी, ग्रामीण अथवा शहरी समाज असो ) सम्यक आकलन होण्याकरिता स्त्रियांच्या दर्जा विषयी अध्ययन करणे अतिशय आवश्यक आहे. आजच्या आधुनिक आणि वैज्ञानिक युगामध्ये स्त्रियांची प्रगती, स्त्रियांच्या कल्याणाच्या माध्यमातून स्त्री सक्षमीकरण या विचाराला समाजातील किंवा जमातीतील सर्व स्तरातून फार मोठ्या प्रमाणामध्ये मान्यता मिळत आहे. ज्या कुटुंबातील, जमातीतील किंवा समाजातील किंवा ज्या देशातील स्त्री ही सक्षम असते ते कुटुंब, ती जमात अथवा तो समाज, तो देश हा कायमच विकासात पुढे असल्याचे आपणास प्रकर्षाने आढळून येते. प्राचीन काळापासून स्त्रीला सृष्टीची जननी असे म्हटले जाते. स्त्रीला पुराणकाळामध्ये देवता मानल्या जात असत. तसेच स्त्रीला लक्ष्मी, पार्वती, सरस्वती व अंबाबाई अशा विविध रूपाने ओळखले जात असत. स्त्रीची पूजा मनोभावेने करण्यात येत असत.

त्याचप्रमाणे स्त्री ही आदिशक्ती, आदिमाया अशा वेगवेगळ्या नावांनी देखील ओळखण्यात येते. निसर्गसृष्टी समजली जाते. प्राचीन काळापासून स्त्रीला सृष्टीची जननी असे म्हटले जाते. स्त्रीला पुराणकथामध्ये देवता मानल्या जात असत तसेच स्त्रीला लक्ष्मीअसे देखील मानले जात असत. समाजाच्या जनगणनेमध्ये स्त्रियांचे योगदान अतिशय महत्त्वपूर्ण असल्याचे आढळून येते नव्हे तर स्त्रियांचे योगदानाची वेळ कोणत्याही समाजाची जमातीची अथवा राष्ट्राचे कल्याण होऊ शकत नाही आणि म्हणून प्रत्येक क्षेत्रात आज स्त्रियांनी फार मोठ्या प्रमाणात नेत्र दीपक प्रगती करून उंच भरारी झेप घेतल्याचे आपणास आढळून येते. तसेच स्त्रीशिवाय विकासाची कल्पना देखील करू शकत नाही. यांला आदिवासी हलबा जमातीतील स्त्री देखील अपवाद ठरू शकत नाही. हलबा जमातीमध्ये स्त्रियांनी शिक्षणाच्या माध्यमातून प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहेत. प्रत्येक क्षेत्रात हलबा जमातीतील स्त्री हे शिक्षित होऊन स्वतःला, कुटुंबाला, समाजाला आणि राष्ट्राला सक्षम करण्यासाठी सदोदित प्रयत्नशील आहे.

आदिशक्ती, महाशक्ती, वरदायिनी दिव्यशक्ती तू. ...
तू रूप कर्तृत्वाच , प्रेमा वासल्याची
सगुण मूर्ती तू ...
विश्वासाचा आकार तू, आकाशाएवढी उत्तुंग तू ...

उपरोक्त आशयावरून आपल्याला स्त्रियांचे महात्म्य किती आहे, याची कल्पना येते. परंतु भारत देशात पुरुषप्रधान संस्कृती असल्यामुळे भारतातील समाजात स्त्रीला कायमचे दुय्यम स्थान देण्यात आले. मध्ययुगीन कालखंडामध्ये देखील अतिशय भयावह स्थिती स्त्रियांच्या दृष्टीने असल्याचे आपणास दिसून येते. स्त्री ही कमी प्रतीची समजल्या जाते. तिला समाजात गौण स्थान देण्यात आले होते. संपूर्ण विश्वामधील कोणत्याही देशातील स्त्रीला गौण समजले जात असत. स्त्रीला माणूस म्हणून समानतेचा दर्जा दिला जात नव्हता. स्त्रीचा जन्म हे पुरुषांसाठी झालेले आहे, असे धार्मिक ग्रंथांमध्ये देखील उल्लेख आहे. हिंदू धर्मात स्त्रीला अर्धांगिनी मानले जाते. ख्रिश्चन धर्मात ' सुख दुःखात पुरुषाची इच्छा, तीच तुझी इच्छा असेल' असे सांगितले आहे. तर कुराणमध्ये स्त्रीचे स्थान हे गौण असे मानले आहे. महामनु यांनी सुद्धा स्त्री म्हणजे खोटेपणा, साहस, माया यांचे रूप असते. स्त्री ही बालपणात वडील, तरुणपणात पती आणि वृद्धापकाळात मुलगा यावर स्त्री अवलंबून असावी. स्त्रीला स्वतंत्रपणे जगण्याची तिची पात्रताच नाही, असे सांगितले आहे.

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

स्त्रियांना आजही समाजामध्ये दुय्यम स्थान हे तिच्या जन्मापासूनच मिळत असल्याचे आपणास आढळून येते.आजही अनेक घरांमध्ये मुलांकडे बघण्याच्या दृष्टिकोन हा वेगळ्या प्रकारचा आहे. मुलगी जन्माला आल्यावर त्या कुटुंबातील लोकांच्या बघण्याच्या दृष्टिकोन हा अतिशय निंदनीय आणि घृणास्पद असतो. नव्हे तर मुलगा हा वंशाचा दिवा असून तोच खरा वंशवेल असल्याचे समजतात. तर मुलगी ही परक्याचे धन असून तिला जीवनातील किंवा कुटुंबातील ओझे समजण्यात येते. इतकेच नव्हे तर ज्या कुटुंबात मुलाचा जन्म होतो त्या कुटुंबामध्ये मुलांच्या स्वागतासाठी फार मोठी जय्यत तयारी करून पेढे वाटले जाते. तर मुलगी जन्माला आली असल्यास जिलेबी वाटल्या जाते. जोपर्यंत अशा प्रकारची बुरसटलेली मानसिकता समाजातील लोकांमध्ये असेल, तोपर्यंत स्त्रियांना समाजामध्ये दुय्यम दर्जा देऊन तिला गौण समजण्यात येईल.

आज समाजातील प्रत्येक व्यक्तीला आई हवी आहे, ताई हवी आहे, मावशी हवी आहे, आत्या हवी आहे , काकू हवी आहे, मामी हवी आहे, मैत्रीण हवी आहे, परंतु समाजात परंतु मुलीला जन्म देण्यासाठी खूपवेळा विचार करावा लागतो स्त्रीचे स्त्रीत्व संपले तर तो दिवस फार दूर नाही की, ज्यामुळे कुणालाही मुलगी मिळणार नाही. याकरिता सुशिक्षित आणि स्वतःला उच्च विद्याविभूषित समजणारे लोकच हे डॉक्टर कडे जाऊन गर्भलिंग तपासणी करून मुलगी असेल तर तिची आईच्या पोटातच नाजूक कळी उमलन्यापूर्वीच तिला तोडण्याचे प्रयत्न केले जातात आणि मुलगा असेल तर त्याला जपून ठेवून त्याची योग्य ती काळजी घेतली जाते . अशा प्रवृत्तीचे लोक जोपर्यंत समाजामध्ये असणार तोपर्यंत स्त्रियांची प्रगती होणे शक्य नाही आणि स्त्रियांकडे पाण्याचा दृष्टिकोनातून आदरहीन असेल.

कोणत्याही जमातीमध्ये किंवा समाजामध्ये स्त्रियांच्या सशक्तीकरणासाठी त्या जमातीमध्ये स्त्रीला मानाचे स्थान देऊन ताठ मानेने आणि स्वाभिमानाने जीवन जगण्याकरिता आर्थिक सहकार्य करून तिला जीवनाप्रती सक्षम बनविणे आवश्यक आहे. तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ जमातीतील स्त्रियांना झाल्यामुळे निश्चितच स्त्रियांचे सक्षमीकरण झाल्याशिवाय राहणार नाही. नव्हे तर आजच्या वैज्ञानिक आणि स्पर्धेच्या युगामध्ये स्त्रियांची आर्थिक प्रगती होऊन स्वावलंबी बनून त्या स्वतःच्या पायावर उभे राहणे अतिशय आवश्यक आहे.

स्त्री ही जात्याच कोमल, प्रेमळ असते. सगळ्याच नात्यावर जीवापाड माया करत असते. तिने कायम शोषिकच राहावं हीच अपेक्षा तिच्याकडून केली जाते. परंतु हे कुठपर्यंत चालत राहणार. कधीतरी तिचीही सहनशक्ती तोकडी पडते. मग ती कुठल्या शस्त्राने प्रतिकार करते, स्त्रीच्या जीवनात आलेला प्रत्येक पुरुष हा मग तो भाऊ, मुलगा, पती, पिता किंवा कुणीही असला तरी तिच्यावर कायमच अधिकार गजवितो. तिला गृहीत धरत राहतो. ती तरीही त्या सगळ्या नात्यांवर स्वभावताच विनाशर्त प्रेम करत राहते.

स्त्रीची कोमलता, सुंदरता, शोषिकता यालाच अवाजवी महत्त्व देऊन ती त्यातच अधिकाधिक गुरफडून दबलेली कशी राहील याचा विचार श्रेष्ठत्वाच्या भावनेतून पुरुषसत्ताक पद्धतीत केला गेला. तेव्हा अशा आपलं आत्मभान हरून गेलेल्या स्त्रीला स्वतःची जाणीव होऊन बंड करण्याची शक्ती ही जागृत होते. अलीकडे हलबा जमातीमधील स्त्रिया हया अनेक प्रश्नावर आपले परखड मत व्यक्त करतना दिसून येतात.

आता सोडायला हवा लाजेचा पडदा,

रस्त्यावर उतरून आले पाहिजे
तू एकटी नाहीस, तुझ्या सोबत आहेत
हजार मनगटे,फक्त एकदाच हो एकदाच
स्वतःच्या हक्कासाठी , आसमंतात निनादू दे
मुक्त आवाजात, तुझी घोषणा !

स्त्री सक्षमीकरणाचा अतिशय महत्त्वाचा भाग शिक्षण , कौशल्य- निर्माण, रोजगार, आरोग्य सेवा आणि योग्य निर्णय घेण्याच्या माध्यमातून येतो. ज्या स्त्रिया किंवा मुली उच्चशिक्षित अथवा शिक्षित आहेत आणि ज्या स्त्रिया किंवा मुली करिअर करतात त्या उर्वरित आयुष्यामध्ये देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये आपले योगदान देतात. स्त्री सक्षमीकरण ही राजकीय स्थिरता, आर्थिक वाढ, लैंगिक समानता आणि सामाजिक परिवर्तनाची अतिशय महत्त्वपूर्ण गुरुकिल्लीआहे.

जेव्हा समाजातील किंवा जमातीतील स्त्रिया आणि मुलींना कौशल्य विकसित करण्यासाठी त्यांच्या स्वप्नांचा पाठपुरावा करण्यासाठी आणि त्यांच्या स्वतःच्या जीवनावर नियंत्रण ठेवण्याकरिता पाठिंबा दिला जातो, तेव्हा त्यांना बोलण्याकरिता आणि त्यांच्या समाजाकरिता किंवा जमाती करता अधिकाधिक यश प्राप्त करण्याचा आत्मविश्वास प्राप्त होतो. हलबा जमातीतील स्त्रियांचा मानसन्मान, सहभाग तसेच जमातीतील स्त्रियांचे राजकीय क्षेत्रातील समान प्रतिनिधित्व, स्त्रियांना त्यांच्या चिंता आणि आव्हाने मांडण्यास सक्षम करित असल्यामुळे जमातीतील सर्व स्त्रियांना त्याचा निश्चित फायदा होईल यात तीळमात्र शंका नाही. हलबा जमातीतील स्त्रीच्या सक्षमीकरणाच्या प्रवासात फार मोठ्या प्रमाणावर अडथळा म्हणून पाहिले जाऊ शकणारे आव्हान हे मानसिकता बदलविणे हे असू शकते. कारण अशा प्रकारची मानसिक वृत्ती हे पुरुषप्रधान संस्कृती तसेच प्रथा आणि परंपरा यामध्येच फार खोलवर रुजलेली आहे. स्त्री सक्षमीकरणाच्या प्रयत्नामध्ये विविध स्तरातून मदतीचा आणि मार्गदर्शनाचा हस्तक्षेप होणे ही आधुनिक युगात काळाची गरज आहे. अशा प्रकारचे सहाय्य हे सर्वसमावेशक व भेदभाव विहीन, विज्ञान व संशोधन तसेच सर्जनशील व कलात्मक आणि सामाजिक स्तरावर स्त्रियांबाबत संवेदनशीलतेला प्रोत्साहन देणारे असायला हवेत. जमातीत किंवा समाजामध्ये समता प्रस्थापित करण्यासाठी आणि हे कार्य पुढे नेण्याच्या प्रवासात पुरुष तरुण मुले व मुली यांनी एकत्रितपणे येऊन लोकांना सक्रियपणे समाविष्ट केल्याशिवाय स्त्री सक्षमीकरण साध्य करणे शक्य नाही. हलबा जमातीतील स्त्रियांना सन्मानाची वागणूक प्रदान करणे आणि जमातीत लैंगिक समानतेबाबत कुठलीही तडजोड न करता वरील सर्व प्रयत्न प्रत्यक्षात आणण्याकरिता हलबा जमातीतील तरुण वर्गाने ( मुले / मुली ) यांनी एकत्रितपणे कार्य करणे अत्यंत अनिवार्य आहे, नव्हे तर ती काळाची गरज आहे.

ग्रामीण आणि शहरी भागातील हलबा जमातीतील स्त्रियाना संघटित करून संघटनेची निर्मिती करणे तसेच स्त्रियांच्या उदरनिर्वाहाकरिता आणि सक्षमीकरणाकरिता शासनाद्वारे लघु उद्योगांना पाठबळ देऊन आणि पतपुरवठ्याची सुविधा उपलब्ध करून देऊन हलबा जमातीतील स्त्रियांच्या आयुष्यात फार मोठ्या प्रमाणात आमुलाग्र परिवर्तन घडून येण्यास मदत होईल.

**हलबा जमातीतील स्त्रियांचे झालेले सक्षमीकरण** -

१. स्त्रियांची शैक्षणिक क्षेत्रात झालेली प्रगती:-

विसाव्या शतकात हलबा जमातीतील स्त्रियांची शिक्षणामध्ये फारशी प्रगती झालेली नव्हती. त्यामुळे स्त्रिया शिक्षणापासून कोसो दूर असल्यामुळे त्यांचा योग्य त्या प्रमाणामध्ये विकास झालेला नव्हता. त्यामुळे स्त्री ही हाताला मिळेल ते काम करून आपल्या कुटुंबाचे उदरनिर्वाह करून कुटुंबाचा गाडा चालवत असे. परंतु कालांतराने स्त्रियांना शिक्षणाचे महत्त्व वाटू लागल्यामुळे त्यांनी शिक्षणामध्ये प्रगती केली आहे. नव्हे तर शिक्षणाच्या माध्यमातून कुटुंबाची आणि जमातीचे फार मोठ्या प्रमाणात प्रगती होऊन परिवर्तन झालेले आहे. याचाच परिणाम हलबा जमातीतील स्त्रिया या परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करून आज जमातीतील स्त्रिया या डॉक्टर, इंजिनिअर, वकील, न्यायाधीश तसेच इतर क्षेत्रातही उच्च पदावर असल्याचे दिसून येते.

२. आर्थिक क्षेत्रात झालेली प्रगती :-

हलबा जमातीतील स्त्री ही आधुनिक आणि वैज्ञानिक युगामध्ये वावरताना ती समर्थपणे कुटुंबाचा गाडा सांभाळीत आहे. तसेच ति चार भिंतीच्या आत नं राहता घराबाहेर पडू लागली आहे. हलबा जमातीतील स्त्री ही आर्थिक व्यवहार आणि आर्थिक देवाणघेवाण करण्यास सक्षम असल्यामुळे हलबा जमातीतील स्त्रियांचे सक्षमीकरण होताना आढळून येते.

३. पारंपरिक मूल्यांमध्ये झालेले परिवर्तन:-

आदिवासी हलबा जमातीमध्ये स्त्रियांनी आधुनिक विचारसरणीचा स्वीकार केल्यामुळे त्यांच्या फार मोठ्या प्रमाणात परिवर्तन झालेला आहे. ग्रामीण भागातील स्त्रियांपेक्षा शहरी भागातील स्त्रियांमध्ये फारच परिवर्तन झालेले आढळून येते. ग्रामीण भागतील स्त्रिया या आजही वैज्ञानिक युगामध्ये वावरताना पारंपारिक मूल्यांचा स्वीकार करताना आढळून येतात. तर शहरी भागातील स्त्रियांमध्ये स्त्रियांची राहणीमान, वेशभूषा, खानपान, विचारप्रणाली, शिक्षण या सर्व बाबतीत परिवर्तन झाल्याचे आढळून येते. त्यामुळे हलबा जमातीतील स्त्रियांमध्ये सक्षमीकरणाचे प्रमाण दिसून येते.

४. वैचारिक क्षमतेत वाढ:-

हलबा जमातीतील स्त्रियांमध्ये शिक्षणाच्या प्रभावामुळे त्यांच्या विचारक्षमतेत प्रगती झालेली आहे. तसेच शिक्षणाच्या प्रभावामुळे जमातीतील स्त्री ही सकारात्मक विचार करीत असून त्यांना आपले कर्तव्य आणि अधिकाऱ्याची जाणीव निर्माण होऊन त्यांच्या वैचारिक क्षमतेत वृद्धी झाल्याचे आढळून येते. त्यामुळे आदिवासी हलबा जमातीतील स्त्रिया या सक्षमीकरणाकडे वाटचाल करताना दिसून येतात.

५. स्त्रियांना कौटुंबिक अधिकार:-

हलबा जमातीमध्ये स्त्रियांना पुरुषांप्रमाणेच कौटुंबिक अधिकार प्राप्त झालेले आहे. तसेच स्त्रियांच्या मताला कौटुंबिक, धार्मिक आणि इतर कार्यात स्थान मिळून त्यांची मते विचारात घेतली जाते. त्यामुळे जमातीतील स्त्रियांना आपल्या मताप्रमाणे निर्णय घेण्याचे आणि वागण्याचे अधिकार प्राप्त झालेले आहे. त्यामुळे स्त्रियांच्या कुटुंबातील प्रगती होऊन ती यशस्वीतेकडे वाटचाल करताना आढळून येते.

६. साक्षरतेचे वाढते प्रमाण:-

आदिवासी हलबा जमातीतील स्त्रियांमध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढलेले असून जमातीतील स्त्रियामधील त्यांचा दर्जा आणि भूमिका यामध्ये फार मोठ्या प्रमाणात सकारात्मक परिवर्तन होऊन जमातीतील इतर लोकांचा अथवा स्त्रियांचा पाहण्याचा दृष्टिकोन बदललेला दिसून येतो. त्यामुळे जमातीतील स्त्रियांची प्रतिमा बदलून, ती सकारात्मक होऊन ती प्रगती पथाकडे वाटचाल करताना आढळते. त्यामुळे

जमातीमधील स्त्रियांमध्ये परिवर्तन होऊन हलबा जमातीतील स्त्रियांमध्ये सक्षमीकरण झाल्याचे दिसून येते.

७. राजकीय क्षेत्रात झालेले परिवर्तन:-

आदिवासी हलबा जमातीतील स्त्रिया या राजकीय क्षेत्रात सक्रिय असून विविध महत्त्वाच्या पदावर कार्यरत आहेत. आधुनिक काळामध्ये हलबा जमातीतील देशाच्या राजकारणाविषयी स्त्रियांना आवड निर्माण झालेली आहे. त्यामुळे स्त्रियांना देशांमध्ये घडत असलेल्या सामाजिक समस्यांची जाणीव होऊन जमातीतील लोकांना न्याय देण्यासाठी सक्षम झालेल्या आढळून येतात. त्यामुळे हलबा जमातीतील स्त्रियांमध्ये परिवर्तन झालेले दिसून येते.

उपरोक्त सर्व घटकामुळे आदिवासी हलबा जमातीतील स्त्रियांमध्ये परिवर्तन झालेला दिसून येतो. त्यामुळे हलबा जमातीतील स्त्रियांमध्ये स्त्रियांचे सक्षमीकरण होऊन हलबा जमातीतील स्त्रिया ह्या सक्षमीकरणाकडे वाटचाल करताना दिसून येतात, असे अभिमानाने सांगावेसे वाटते.

**हलबा जमातीतील स्त्री सक्षमीकरणासाठी भविष्यातील वाटचाल :-**

१. हलबा जमातीमध्ये स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी शासनाद्वारे विविध प्रशिक्षण कार्यक्रम किमान किमतीमध्ये किंवा मोफत आयोजित करण्यात यावेत.

२. हलबा जमातीमधील स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी शासनाच्या माध्यमातून बालपणापासून आणि पुढील उच्च शिक्षणाकरिता मोफत आणि दर्जेदार शिक्षण देणाऱ्या संस्थांची स्थापना करणे.

३. हलबा जमातीतील स्त्रियांच्या सक्षमीकरण करिता शासनाद्वारे आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात यावेत.

४. हलबा जमातीतील स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी शासकीय योजनाविषयी जनजागृती करणे.

५. हलबा जमातीतील स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्याकरिता प्रक्रिया सोपी करणे.

**संदर्भ ग्रंथ सूची :-**

*1.शिक्षण आणि समाज (त्रैमासिक) एप्रिल - जून 2006*
*2. योजना (मासिक) डिसेंबर 2021*
*3. दैनिक सकाळ, (वृत्तपत्र) ४ मार्च 2022*
*4. दैनिक सकाळ, (वृत्तपत्र) ६ मार्च 2022*
*5. योजना (मासिक) मार्च 2022*
*6.योजना (मासिक) सप्टेंबर 2022*

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*